From: **P Khedekar** <pkhedekar.mss@gmail.com>
Date: Thu, 28 Sept 2023, 15:09
Subject: Re: death of an Era.
To: Ramesh Thakare <rameshthakare8@gmail.com>, Brig.Sawant Sudhir
<sudhirsawant09@gmail.com>

++++ भावपूर्ण शिवांजली अर्पण ---
प्रती ,
प्रा डॉ रमेश ठाकरे सर व सहकारी ,
अतिशय धक्कादायक व वेदनादायक बातमी आहे . डॉ स्वामिनाथन यांनी साठच्या दशकात भारतातल्या परंपरागत शेती व्यवसायात आमुलाग्र बदल घडवून आणला होता . परिणामी एकेकाळी अन्नधान्य आयात करणारा भारत देश स्वयंपूर्ण झाला . आणि गेल्या काही दशकांपासून अन्नधान्य निर्यातदार बनला आहे . परंतू दुर्दैवाने शेतकऱ्यांना त्या बदल्यात काही मिळाले नाही . १९८५ पासून महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करत आहेत . हे सर्व थांबवण्यासाठी एकमेव पर्याय समोर आहे तो शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित बाजार मूल्य व योग्य नफा .
डॉ स्वामिनाथन यांनी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी व डॉ मनमोहन सिंग यांच्या काळात तसा अहवाल सादर केला होता .. सर्वसामान्य शेतकऱ्यांना किमान वर्ग तीन ते चार मधील केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या एवढे दरमहा शाश्वत. उत्पन्न मिळाले पाहिजे अशी प्रमुख शिफारस केली होती . त्यासाठी उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा हे एक सूत्र होते . याशिवाय काही अन्य शिफारशी केल्या होत्या . त्यानंतरच्या काही राजकीय पक्षांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात तशा घोषणाही केल्या होत्या . परंतू त्यांचे पालन केले नाही . उलट दिल्ली सारख्या देशाच्या राजधानीत शेतकरी शेतमजूर कष्टकरी बांधवांना वेठीस धरले होते ...
या पार्श्वभूमीवर प्रा डॉ स्वामिनाथन सरांनी अखेरचा श्वास घेतला आहे असे आपल्याकडून समजले . डॉ स्वामिनाथन हे एक व्यक्ती नव्हते तर ते एक कृतीशील व वैचारीक संस्था झाले होते . अशा एका आधुनिक भारतातील महान तत्त्ववेत्ता व कृषी क्रांतीचे जनक डॉ स्वामिनाथन यांना मराठा सेवा संघ व आमच्या खेडेकर कुटुंबियांच्या वतीने भावपूर्ण शिवांजली अर्पण ...

पुरुषोत्तम व रेखाताई खेडेकर चिखली .
दिनांक २८-९-२०२३ .